MHRG100011732024

# फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २६/२०२४ मधील निशाणी क्र. १६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांनी कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २७ (१)अ अन्वये दाखल केला आहे.

२. सामनेवाला यांनी कथन केले की, अर्जदार यांनी त्यांचे अर्जात कलम ८, १०, १४ मध्ये शिवाजीनगर, चांभारखिंड, ता. महाड, जि. रायगड येथे त्यांचे वडिलांकडे राहत असल्याचे नमुद केले आहे. परंतु, त्यांनी त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे दाखल केले नाहीत. सामनेवाला यांनी अर्जदार यांचे विरूध्द पुणे येथील मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात घटस्फोटाचे पिटीशन दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी त्याचा राहण्याचा पत्ता रा. निलकंठ हाईट्स, बी विंग, १३०३, डॉमिनोज जवळ, कळंबोली, नवीन पनवेल, ४१०२१८ हा राहण्याचा पत्ता दिला आहे. अर्जदार या घटस्फोटाचे पिटीशनमध्ये हजर असतात, परंतु त्यांनी सदरील त्याचा राहण्याचा पत्ता पनवेल हाच नमुद केलेला आहे.

३. सामनेवाला यांनी पुढे कथन केले की, त्यांनी घटस्फोटाचे पिटीशनमध्ये अर्जदार यांचे वडिलांचे पत्त्यावर रा. द्वारा रविंद्र शंकरराव चव्हाण, लक्ष्मी निवास, मु. पो. महाड, चांभारखिंड, ता. महाड, जि. रायगड येथे समन्स नोटीस बजावणी केली होती. त्यावर सदरहु समन्सातील प्रती यांचा तपास दिलेल्या पत्त्यावर करीता त्या समक्ष भेटल्या नाहीत. त्यांचे वडील रविंद्र शंकरराव चव्हाण हे समक्ष भेटले. त्यांनी सांगितले की, त्यांची मुलगी गेली काही वर्षे माहेरी आलेली नाही

व ती कुठे राहते हे त्यांना माहिती नाही. सबब, समन्सातील प्रती अर्जदार या समक्ष न भेटल्याने त्यांचे नावाचे समन्स न बजावता परत आले आहे. हा बेलीफ रिपोर्ट दिनांक ११/११/२०२२ रोजी न्यायालयात दाखल आहे.

४. सामनेवाला यांनी पुढे असेही कथन केले की, अर्जदार या जुलै, २०२२ ते जुलै, २०२५ पर्यंत पनवेल नवी मुंबई येथे राहत असुन त्यांचे प्लॅनेट डिझायनर ब्युटीक याचे शोरूम्स/दुकाने आहेत. तसेच, अर्जदार यांचे पिंपरी, पुणे येथील बँकेत दोन खाते आहेत. सदर दोन बँक खात्याची माहिती जाब देणार यांना आहे. सदरची दोन्ही बँक खाती चालु आहेत.

५. सामनेवाला यांनी असे कथन केले की, अर्जदार या कायमस्वरूपी तसेच तात्पुरत्या स्वरूपातही या न्यायालयाच्या स्थळसिमेत राहत नाहीत तसेच काम करीत नाही. अर्जदार ही माहेरी ही राहत नाही, असे त्यांचे वडिलांनी बेलीफ रिपोर्टमध्ये नमुद केले आहे. त्यामुळे सदरील अर्ज चालविण्याचे अधिकार क्षेत्र नाही, त्यामुळे त्यांनी अर्जदार यांचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

६. अर्जदार यांनी निशाणी क्र. २१ वर त्यांचे म्हणणे सादर करून सदर अर्जास हरकत नोंदविली. त्यांनी नमुद केले की, सामनेवाला यांनी दाखल केलेला अर्ज बेकायदेशीर व चुकीचा असुन कायदयाने टिकणारा नसुन फेटाळण्यास पात्र आहे. अर्जदार यांनी मुद्दा क्र. १ मधील मजकुर बरोबर असल्याचे मान्य करून मुद्दे क्रमांक २ ते १० हे मान्य नसल्याचे कथन केले.

७. अर्जदार यांनी पुढे नमुद केले की, तिचा व सामनेवाला यांचा विवाह झाला त्यावेळी अर्जदारांचे वडील मौजे चांभारखिंड, महाड येथे राहत होते व आजही अर्जदारचे वडील मौजे चांभारखिंड, महाड येथेच राहतात. सामनेवाला यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये अनु. क्र. ८ कडील दाखल घटस्फोट अर्जामध्ये सामनेवाला यांनी अर्जदार यांचा पत्ता मौजे चांभारखिंड, महाड हाच नमुद केलेला आहे व याच

पत्त्यावर अर्जदार हिस घटस्फोट अर्जाची नोटीस प्राप्त झालेली आहे.

८. अर्जदार यांनी नमुद केले की, त्यांनी घटस्फोट अर्जाकामी पुणे येथील कोर्टात हजर झाल्यांनतर दिलेली पत्ता पुरशीस ही तिच्या तात्पुरत्या पत्त्याची माहिती होती. अर्जदार ही आता त्या पत्त्यावर राहत नसुन मौजे चांभारखिंड, ता. महाड या पत्त्यावर राहते. अर्जदार हिस पत्ता बदल्यानंतर कोर्टात माहिती दयावी लागते, याची कल्पना नसल्यामुळे तिने त्याबाबत वकीलांस सांगितले नव्हते. केवळ बेलीफ रिपोर्ट व पत्ता पुरशीस यांचा आधार घेवुन सामनेवाला प्रस्तुत अर्जातील कार्यवाहीपासुन पळ काढु शकत नाहीत. वरील सर्व कारणांचा विचार करता, सामनेवाला यांचा निशाणी क्र. १६ कडील अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

९. सामनेवाला यांनी निशाणी क्र. २२ वर प्रस्तुत अर्जास त्यांचा लेखी युक्तीवाद दाखल करून अर्जातील सर्व कथने पुनउच्चारित केली आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता मोजका युक्तीवाद नमुद करण्यात येतो. अर्जदार यांनी दिनांक ३०/०८/२०२५ रोजी खोटया आशयाचे व अर्जदार या शिवाजीनगर, चांभारखिंड, महाड येथे त्यांच्या वडिलांकडे राहत असल्याचे कोणतेही कागदपत्रे न्यायालयात दाखल केलेली नाहीत. अर्जदार त्यांच्या वडिलांकडे शिवाजीनगर, चांभारखिंड, महाड येथे राहत असल्याचे नमुद केले आहे, परंतु त्याबाबतचे कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. त्यांनी घटस्फोटाचे पिटीशनमध्ये अर्जदार यांचे वडिलांचे पत्त्यावर रा. द्वारा रविंद्र शंकरराव चव्हाण, लक्ष्मी निवास, मु. पो. महाड, चांभारखिंड, ता. महाड, जि. रायगड येथे समन्स नोटीस बजावणी केली होती. अर्जदार या जुलै, २०२२ ते जुलै, २०२५ पर्यंत पनवेल नवी मुंबई येथे राहत असुन त्यांचे प्लॅनेट डिझायनर ब्युॅटीक याचे शोरूम्स/दुकाने आहेत.

१०. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, तिचा व सामनेवाला यांचा विवाह झाला त्यावेळी अर्जदारांचे वडील मौजे चांभारखिंड, महाड येथे राहत होते व आजही अर्जदारचे वडील मौजे चांभारखिंड, महाड येथेच राहतात.

सामनेवाला यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये अनु. क्र. ८ कडील दाखल घटस्फोट अर्जामध्ये सामनेवाला यांनी अर्जदार यांचा पत्ता मौजे चांभारखिंड, महाड हाच नमुद केलेला आहे व याच पत्त्यावर अर्जदार हिस घटस्फोट अर्जाची नोटीस प्राप्त झालेली आहे. त्यांनी घटस्फोट अर्जाकामी पुणे येथील कोर्टात हजर झाल्यांनतर दिलेली पत्ता पुरशीस ही तिच्या तात्पुरत्या पत्त्याची माहिती होती. अर्जदार ही आता त्या पत्त्यावर राहत नसुन मौजे चांभारखिंड, ता. महाड या पत्त्यावर राहते. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**११.** सामनेवाला व अर्जदार यांच्या परस्पर विरोधी कथनांची कारणमिमांसा ही कायदयाच्या तरतुदीनुसार पडताळणी आवश्यक आहे. त्यामुळे कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २७ ची तरतुद अर्जाच्या निकालासाठी नमुद करणे आवश्यक होईल.

**कलम २७: अधिकारक्षेत्र** – प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, ज्यांच्या स्थानिक मर्यादेत खालीलपैकी कोणतीही गोष्ट घडली आहे, ते या कायद्यांतर्गत आदेश (संरक्षण आदेश इ.) देण्यासाठी सक्षम न्यायालय असेल:

- **(अ)** पीडित व्यक्ती (महिला) कायमस्वरूपी किंवा तात्पुरती राहते (resides), किंवा व्यवसाय करते किंवा नोकरी करते;
- **(ब)** उत्तरवादी (Respondent – ज्याच्या विरुद्ध तक्रार आहे) राहतो, व्यवसाय करतो किंवा नोकरी करतो; किंवा
- **(क)** हिंसाचाराची घटना (cause of action) घडली आहे.

**१२.** कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २७ चे काळजीपूर्वक वाचन केल्यावर असे दिसते की, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाला कायद्याअंतर्गत पीडित व्यक्ती कायमस्वरूपी किंवा तात्पुरते वास्तव्य/निवास करत असल्यास प्रकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

**१३.** सामनेवाला यांनी दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या बेलीफ अहवालावर त्यांची भिस्त ठेवली आहे. सामनेवाला यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये अनु. क्र. ८ कडील दाखल घटस्फोट अर्जामध्ये सामनेवाला यांनी अर्जदार यांचा पत्ता मौजे चांभारखिंड, महाड हाच नमुद केलेला आहे व याच पत्त्यावर अर्जदार हिस घटस्फोट अर्जाची नोटीस प्राप्त झालेली आहे. सामनेवाला यांनी अर्जदार ही खारघर, नवी मुंबई येथे व्यवसाय करीत असल्याबाबतच्या छायाचित्रांची प्रत निशाणी क्र. २४ सोबत दाखल केली आहे. तसेच, त्यांनी त्याबाबतचा पेन ड्राईव्ह सुध्दा दाखल केला आहे. त्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता अर्जदार ही सध्या नवी मुंबई येथे राहत असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. कारण त्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार ही खारघर, नवी मुंबई येथे राहत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. थोडया वेळाकरिता अर्जदार ही दिनांक ११/११/२०२२ रोजी खारघर, नवी मुंबई येथे राहत होती असे गृहित धरले तरी तिने त्याच पत्त्यावर सर्व प्रकारचे न्यायालयीन वाद संपुष्टात येईपर्यंत रहावे असा बांधील ताठर निष्कर्ष काढता येणार नाही.

**१४.** भारतीय संस्कृतीनुसार एखादी स्त्री ही सासरी राहत नसेल तर तिच्यासाठी सर्वांत सुरक्षित ठिकाण हे तिचे माहेर असते. त्यामुळे ती कोणत्याही वेळी तिच्या माहेरी राहण्यास जावु शकते. अर्जदाराच्या कथनांनुसार ती सध्या तिच्या वडिलांकडे आधार म्हणुन राहत आहे. कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २७ चे काळजीपूर्वक वाचन केल्यावर असे दिसते की, कायद्याअंतर्गत पीडित व्यक्ती कायमस्वरूपी किंवा तात्पुरते वास्तव्य/निवास करत असल्यास प्रकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. अर्जदारने प्रस्तुत प्रकरणी तिच्या वडिलांच्या घरचा पत्ता नमुद केला आहे. त्यामुळे कायदयाच्या तरतुदीनुसार प्रकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार हा या न्यायालयास प्राप्त होतो. वरील सर्व विवेचनांवरून, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | सामनेवाला यांचा अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| **२.** | सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी. |
| *(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)* | |

JADHAV UDAY MAHADEV

Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.02.28 16:45:57 +0530

महाड,
दिनांक : २८/०२/२०२६.

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. Bhushan T. Deshmukh |
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav, 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Date of decision / typed | :- | 28/02/2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 28/02/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 28/02/2026 |